# खलील जिब्रानच्या उत्कृष्ट कथा

खलील जिब्रान

अनुवाद

स्मिता लिमये

रिया पब्लिकेशन्स्

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**खलील जिब्रानच्या उत्कृष्ट कथा :** खलील जिब्रान
अनुवाद : स्मिता लिमये

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**अनुवाद**
स्मिता लिमये
२८६, सुप्रभात संकुल,
फ्लॅट नं.- १०३, ४४००१०
मो. नं. : ९८२३१५३६५५

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २३०/-

# *परिचय...*

खलील जिब्राननं आपल्या जीवनाचे फक्त एकवीस वसंतच पाहिले होते की तोपर्यंत लेबनानमध्ये अराजकाचे वातावरण निर्माण झाले. एका युवकाने पादरी व शासकांच्या निरंकुश सत्तेला आव्हान देऊन टाकलं होतं. तसं पाहिलं तर त्याला आपल्या ख्रिस्ती धर्माबद्दल अत्यंत जिव्हाळा होता; पण तो दांभिकतेच्या पूर्ण विरोधात होता. तुर्की शासकांनी त्याच्या देशात अत्याचार माजवून ठेवला होता. चर्चला पूर्ण संरक्षण होते. पादरी लोक चर्चच्या छायेखाली भोळ्या-गरीब जनतेचे शोषण करीत होते. बायबल व ख्रिस्ताच्या शिकवण्यांना मनमानी व चुकीच्या प्रकाराने त्यांच्यावर लादून, त्यांना फसवून आपलं घर भरत होते. शासक त्यांच्या प्रवृत्तींना उत्तेजन देत होते. या प्रकारे दोन्हींकडून मार खात असलेली जनता आक्रोश करीत असली तरी ऐकणारा कुणी नव्हता. तो युवक हे सगळं निरखत होता. त्याच्या मस्तकात ठिणगी हळूहळू प्रज्वलित होऊ लागली होती. अखेर एक दिवस स्फोट झाला आणि सगळे स्तंभित झाले. लेबनानच्या गल्ली-बोळांत एका पुस्तकाने वादळ निर्माण केले. तसं पाहता 'स्पिरिट्स रेबेलियस' हे एक कथांचं पुस्तक होतं; पण त्या कथा कसल्या, आगीच्या लसलसणाऱ्या जिव्हाच होत्या जणू! सर्वात जास्त 'खलील द हेरेटिक' या पुस्तकाने चर्चच्या सत्तेला आव्हान दिले. त्याने त्यात म्हटले की, गरीब आपले रक्त-घाम गाळून मेहनतीची भाकरी कमावतात आणि चर्चचे लोक त्यांच्या तोंडचा घास हिसकावून घेतात. त्यांच्या शेतात पिकलेल्या धान्याने आपलं भांडार भरतात. तुम्ही धर्माच्या नावावर त्यांना हरप्रकारे लुटताहात. त्यांच्याकडून हिसकावलेलं सर्व त्यांना परत करून त्यांना सुखानं जगू द्यायला हवं. खलील आपल्या कथेत हा आवाज बुलंद करतो व इथूनच सुरू होते त्याच्या विरुद्ध एका संपूर्ण बलाढ्य सत्तेची मोर्चेबांधणी!

सत्ताधारी लोकांना हे कसं काय सहन व्हायचं होतं? धर्म आणि राजसत्तेच्या विरुद्ध बंड करणाऱ्याला असंच कसं सोडून दिलं जाईल! अखेर त्याच्या पुस्तकाला जाळून राख केलं गेलं. इतकंच नव्हे, तर त्याला धर्माच्या बाहेर काढून टाकूनदेखील

समाधान झालं नाही तर त्याला देशाच्या बाहेर हद्दपार करून टाकलं. त्यावेळी तो पॅरिसमध्ये राहत होता. त्याला आपल्या हद्दपारीची आणि पुस्तक जाळण्याची खबर पण तिथेच मिळाली. पुस्तक निद्रिस्त लोकांना जागवण्यासाठी आणि त्यांना त्यांच्या अधिकाराबद्दल परिचित करण्यासाठी होतं. तेच राहिलं नाही तर मग त्याचं उद्दिष्टच नष्ट झालं. खलील बेचैन होऊन उठला. त्याने आपल्या रोदिन या चित्रकार मित्राला म्हटलं की ते पुस्तक ताबडतोब छापायला हवं. ज्या मूळ अरबी भाषेत छापलेल्या पुस्तकाने लेबनानच्या त्या दिग्गजांना घाबरवून सोडलं होतं त्याची इंग्रजी आवृत्ती 'स्पिरिट्स रिबेलियस' या नावाने सगळ्या जगात प्रसिद्ध आहे व सर्व प्रमुख भाषांमध्ये त्याचा अनुवाद झालेला आहे. खलील एक अल्पवयीन पण महान दार्शनिक होता. त्याने अवघ्या १५ व्या वर्षी 'द प्रॉफेट' अरबी भाषेत लिहिलं. ही त्याची सर्वश्रेष्ठ कलाकृती मानली जाते. त्याला आपल्या या पुस्तकाबद्दल अतिशय जिव्हाळा होता. तब्बल चार वर्षं त्याचं हस्तलिखित त्याच्याचजवळ पडून राहिलं. जेव्हा कधी संधी मिळेल तेव्हा तो त्यात सुधारणा करायचा, त्याला सजवायचा. जेव्हा हे पुस्तक छापलं गेलं, खलील एका नव्या क्षितिजावर उभा असलेला जगाला दिसून आला. या पुस्तकाच्या प्रती हातोहात खपल्या; कारण त्यात पिडलेल्या व अन्यायग्रस्त मानवाला त्याच्या अस्तित्वाची जाणीव करून देण्यात आली होती, त्याच्या कल्याणाबाबत सांगितलं होतं, त्याला आनंदाचा संदेश देण्यात आला होता. त्याच्या रूपात जटिलता नव्हती. ते सहज, स्वाभाविक आणि काव्यमय भाषेत आपलं म्हणणं अशा तऱ्हेनं मांडतं की, वाचक त्यात खोलवर बुडून स्वत:साठी अमूल्य मोती शोधूनच घेतो.

त्याच्या अल्प वयाबद्दल विषय निघालाच आहे तर त्याने सोळाव्या वर्षीच 'अल हकीकत' ही मासिक पत्रिका काढली, हे नमूद करावं लागेल. त्यात साहित्य आणि दर्शन याबद्दलचे लेख असत. सतराव्या वर्षी वर्तमानपत्रात गद्य-गीत छापलं गेलं. याचदरम्यान त्यानं अरबी कवींची चित्रं रेखाटली. या चित्रांचे वैशिष्ट्य हे होते की, त्यांना त्याने केवळ आपल्या कल्पनेच्या आधारावर बनवलेली होती; कारण इस्लामच्या उदयाच्या आधी या कवींची चित्रं उपलब्धच नव्हती. खलील एकाच वेळी कवी, चित्रकार व दार्शनिक होता. त्याने पॅरिसमध्ये रोदिनबरोबर राहून चित्रकारितेच्या प्रतिभेला अधिक विकसित केले आणि मग अमेरिकेला

निघून गेला. न्यूयॉर्कमध्ये त्याने आपला एक छोटासा स्टुडिओ थाटला आणि त्यात चित्रं आणि त्याबरोबर साहित्याचे सृजन करीत राहिला. त्याच्या पेंटिंग्जची प्रदर्शनं अमेरिका, फ्रान्स व इंग्लंडमध्ये आयोजित केली गेली. मोठमोठ्या समीक्षकांनी त्याच्या कला प्रतिभेची प्रशंसा केली.

लेबनानमध्ये बशरी गाव आहे. इथेच १८८३ च्या ६ फेब्रुवारीला खलील जिब्रानने या जगात आपले डोळे उघडले. त्याचे कुटुंब मॅग्नाईट कॅथॉलिक ख्रिश्चन होते. आई कलीमी रहिमी व बहीण मरियाना यांनी त्याच्यावर बालपणी जे संस्कार केले त्याच्या पायावर खलीलच्या व्यक्तित्वाची मजबूत इमारत उभी राहिली. तो आपल्या बहिणीला मोठ्या अभिमानाने या धरतीवरच एकमात्र जीवित संत म्हणून संबोधत असे. अकरा वर्षांपर्यंत त्याने घरीच शिक्षण घेतले. अरबी, फ्रेंच व इंग्रजी भाषांचे ज्ञान त्याला तेव्हाच अवगत झाले होते. त्या काळात त्याचा परिवार अमेरिकेत स्थायिक झाला होता. छोट्या खलीलने अरबी भाषेचं अधिक अध्ययन करायचा निश्चय केला. लेबनानला परतल्यावर त्याने बैरूतच्या 'मदसतुल हिकमत'मध्ये दहावीपर्यंत शिक्षण घेतले. अभ्यासाचे हे सत्र नंतर सुरू राहिलं. त्याने वैद्यक धर्माचा इतिहास, संगीत आणि आंतरराष्ट्रीय कायदा याचा पण अभ्यास केला.

खलील जिब्रानने जवळपास पंचवीस पुस्तकं लिहिली. त्यात त्याची रेखाटलेली चित्रंदेखील आहेत. 'द सिक्रेट्स ऑफ द हार्ट' व 'टियर्स अँड लाफ्टर' ही त्याची सुरुवातीची पुस्तकं होती. तारुण्यात लिहिलेल्या या पुस्तकांमध्ये मानवता, प्रेम, सौंदर्य व निसर्ग यावर केंद्रित चिंतन आहे. 'द ब्रोकन विंग्ज'मध्ये त्याच्या स्वत:च्याच जीवन अनुभवांची झलक पाहायला मिळते. त्याने कधीच लग्न केलं नाही. तारुण्यात त्याने सलमा करीमी या युवतीवर प्रेम केलं होतं; पण चर्चच्या एका बिशपने त्यांचे लग्न होऊ दिले नाही आणि आपल्या भाच्याशी तिचे लग्न लावून दिले. खलीलचा हृदयभंग झाला. याच हृदयभंगाच्या व्यथित सावल्या या साहित्यकृतीमध्ये दिसून येतात. 'द मॅडम', 'द फोर रनर', 'द गार्डन ऑफ द प्रॉफेट' या त्याच्या काही श्रेष्ठ कलाकृती आहेत. 'जीझस : द सन ऑफ मॅन' ही त्याची सर्वात अंतिम कामगिरी होती. यात त्याची सकल दृष्टी ख्रिस्ताच्या संपूर्ण स्वरूपावर एकवटलेली दिसून येते. तो ख्रिस्ताला मानवी गुणांनी संपन्न, करुणेचा अवतार व समग्र कल्याणाच्या रचनाकाराच्या स्वरूपात प्रस्तुत करतो. म्हणजेच यथार्थाने तो त्याचा देवदूत होण्याची संवेदनशील घोषणा करतो.

अठ्ठेचाळीस वर्षांचं वय फार मोठं असत नाही. इतक्या अल्प वयात खलील जिब्रानने या जगाचा निरोप घेतला. साल होतं १९३० आणि तारीख एप्रिलची १०! या दिवशी या लहान वयाच्या महान दार्शनिकाने आपल्या जीवनाच्या पुस्तकाचे अखेरचे पान लिहिले. या वयापर्यंत तो प्रसिद्धीच्या शिखरावर पोहोचला होता. अमेरिकेत त्याला मानसन्मान आणि खूप लोकप्रियता मिळाली. अरब देशांमध्येसुद्धा त्याच्या चाहत्यांच्या संख्येचा अंदाज लावणं कठीण होतं. एके दिवशी त्याला ज्या देशातून हद्दपार करण्यात आलं होतं, आता त्याच जमिनीवर त्याच्या नावाचा डंका पिटला जात होता. दोन दिवसपर्यंत त्याचे पार्थिव दर्शनासाठी ठेवले गेले, जिथे अपार गर्दी झाली. खलीलच्या शवपेटीला अमेरिका व लेबनानचे राष्ट्रध्वज गुंडाळले होते. मग 'प्रॉव्हिडंस' नावाच्या जहाजातून त्याला लेबनानमध्ये घेऊन गेले. त्याच्या शवयात्रेला अलोट जनसमूह लोटला होता. तो सर्वच धर्म व संप्रदायांसाठी श्रद्धास्थान बनला होता. मॅरोनाईट कॅथॉलिक, प्रोटेस्टंट, शिया, सुन्नी, यहुदी यांच्याशिवाय अन्य अनेक संप्रदायांचे अनुयायी त्याच्या शवाबरोबर चालत गेले.

ज्या मॅरोनाईट चर्चच्या फर्मानानुसार खलील जिब्रानला हद्दपारीची शिक्षा दिली होती त्याच चर्चच्या हुकमानुसार स्वत:च्या बशरी गावातल्या स्मशानभूमीत त्याचे शव विधिवत व सन्मानाने दफन केले गेले. लेबनानमध्ये आजदेखील खलील जिब्रानची कबर आहे. हजारो लोक या लहान वयाच्या महान दार्शनिकाच्या कबरीवर फूल चढवायला येतात.

खलील जिब्रानचं नाव अगदी समर्पक आहे. खलीलचा अर्थ 'निवडलेला प्रिय मित्र' आणि जिब्रानचा अर्थ आहे 'आत्म्यांना संतोष देणारा.' आपल्या नावाप्रमाणेच त्याने कष्ट सहन करूनसुद्धा प्रत्येक संदेश असा दिला ज्यामुळे संपूर्ण मानवजात सुख, चैन आणि आरामाचे जीवन जगण्याच्या लायक होऊ शकेल.

✦✦✦

# खलिल जिब्रान

या समुद्रकिनाऱ्यावर मी त्याच्या वाळू आणि फेसाच्या मध्ये निरंतर चालत राहीन. अर्थात, समुद्राची भरती माझ्या पाऊलखुणा मिटवून टाकेल आणि आजूबाजूची हवा या फेसालाही उडवून लावेल हे नीसंशय; पण हा समुद्र आणि त्याचा किनारादेखील अगदी नेहमीसाठी अनंत काळासाठी असेच राहतील.

✦

एकदा मी माझ्या मुठीत धुकं भरलं. मग जेव्हा मी ती उघडली, तर धुक्याचं किड्यात रूपांतर झालं होतं.

मी पुन्हा मूठ बंद केली आणि उघडली, तर तिथे किड्याच्या जागी पाखरू होतं.

पुन्हा मी मूठ बंद केली आणि उघडली तर माझ्या तळव्यावर एक माणूस उभा होता, ज्याचा चेहरा शोकमग्न होता आणि नजर वरच्या दिशेला.

मी पुन्हा मुठीला शेवटचं बंद केलं आणि उघडली तेव्हा तिथे धुक्याशिवाय काहीच नव्हतं.

पण यावेळी मी एक अत्यंत मधुर आणि रसपूर्ण गीत ऐकलं.

✦

कालपर्यंत मला असं वाटत होतं की, मी एक सूक्ष्म तुकडा आहे, जो अनियमितपणे जीवनाच्या चक्रात फेऱ्या घालतोय; पण आज मला समजलंय की, मी स्वत:च ते चक्र आहे ज्यात समस्त जीवन नियमितपणे फिरणाऱ्या तुकड्यांबरोबर फेऱ्या घालत आहे.

✦

लोक आपल्या जागृत अवस्थेत मला म्हणतात, ''तू म्हणजे हे विश्व, ज्याच्यात तू राहतोस, एका अनंत समुद्राच्या अनंत किनाऱ्याचा केवळ एक रज:कण मात्र आहेस.''

आणि मी माझ्या स्वप्नमय अवस्थेत त्यांना म्हणतो, ''मीच अनंत समुद्र आहे आणि तिन्ही लोक माझ्या किनाऱ्यावरचे रज:कण आहेत.''

✦

मी केवळ एकदाच निरुत्तर झालोय. असंदेखील तेव्हाच घडलं जेव्हा एका मनुष्यानं मला विचारलं, ''तू कोण आहेस?''

✦

परमात्म्याच्या सर्वप्रथम विचारात मानव एक देवता होता. परमात्म्याच्या सर्वप्रथम वचनात मानव मनुष्यच निघाला.

✦

समुद्र आणि जंगलातल्या हवेमुळे आम्हाला वाचा मिळायच्या हजारो वर्षं आधी, आम्ही मानव या सृष्टीतले फडफडणारे आणि फिरणारे इच्छुक जीवमात्र होतो. मग अशी अवस्था होती, तर आम्ही आपल्या जुन्या गोष्टींना केवळ कालच्या शब्दांमध्ये कशा तऱ्हेनं वर्णन करू शकतो?

✦

स्फिंक्स[१] आपल्या जीवनात केवळ एकदाच बोलला आणि तेव्हा त्यानं हेच म्हटलं, ''एक रज:कण वाळवंट आहे आणि एक वाळवंट रज:कण आहे. आता आम्हा सर्वांना मौन धारण करून घ्यायला हवं.''

मी त्याचं बोलणं ऐकलं तर खरंच; पण मला समजलं मात्र काहीच नाही.

✦

मी एकदा एका स्त्रीच्या चेहऱ्यावर नजर टाकली आणि तिच्या त्या सर्व मुलांना पाहून घेतलं, जे आतापर्यंत जन्माला आले नव्हते.

एका स्त्रीने मला बघितलं आणि तिनं माझ्या सर्व पूर्वजांना जाणलं, जरी ते तिच्या जन्माच्या आधीच मरण पावले होते.

✦

---

१. ग्रीसच्या पौराणिक साहित्यात एका अशा राक्षसाचा उल्लेख आहे, ज्याला पंख असतात, त्याचं शरीर सिंहाचं आणि चेहरा स्त्रीचा असतो. त्याच्याबद्दल ईजिप्तमध्ये अनेक कथा प्रसिद्ध आहेत. त्याला स्फिंक्स म्हणतात. ग्रीस देशाच्या प्राचीन साहित्यातसुद्धा स्फिंक्स नावाच्या पुतळ्याचं वर्णन आहे, ज्याचं शरीर सिंहाचं आणि तोंड स्त्रीचं आहे.

माझी ही इच्छा आहे की, मी आपल्या परम ध्येयाला प्राप्त करावं; पण हे कसं काय होऊ शकेल, जोपर्यंत मी स्वत:ला त्या महानतेमध्ये लीन न करून घेत नाही , जी बुद्धिमान लोकांच्या जीवनात आढळते ?

हीच महानता प्रत्येक मानवाचं ध्येय नाही आहे का ?

✦

मोती एक असं मंदिर आहे, ज्याला दु:ख आणि कष्टाच्या हातांनी एका रज:कणाच्या अवतीभोवती निर्माण केलं आहे.

तर मग कोणत्या इच्छेनं आमच्या शरीरांना निर्माण केलंय आणि ते कोणते रज:कण आहेत ज्यांच्याभोवती आमच्या शरीरांना बनवलंय ?

✦

जेव्हा परमात्म्याने मला एका खड्ड्याच्या रूपात या अद्‌भुत तलावात फेकलं, तेव्हा मी अनंत गिरक्या घेऊन त्याच्या तळाच्या शांततेत विघ्न आणलं.

पण जेव्हा मी त्याच्या खोलवर पोहोचलो तेव्हा मी खूपच शांत झालो होतो.

✦

मला शांतता प्रदान करा, मग मी रात्रीला आव्हान देऊन पुढे निघून जाईन.

✦

माझा दुसरा जन्म त्यावेळी झाला जेव्हा माझा आत्मा आणि माझं शरीर-दोघांनी एकमेकांवर प्रेम केलं आणि त्या दोघांचं नातं जुळलं.

✦

माझी एका व्यक्तीशी ओळख झाली, जिची ऐकण्याची शक्ती अत्यंत तीक्ष्ण होती; पण तो मुका होता, कारण त्याची जीभ एका लढाईत कामी आली.

✦

आज मी त्या साऱ्या लढायांना जाणतो, ज्या त्या व्यक्तीने लढल्या होत्या. याआधी, की ते महान मौन त्याला प्राप्त झालं, मी यासाठी प्रसन्न आहे की तो मरून गेला, कारण हे जग आम्हा दोघांसाठी पुरेसं नाही.

✦

मी एका युगापर्यंत मूक आणि ऋतूंशी अनभिज्ञ असा ग्रीस देशाच्या वाळूत पडून राहिलो.

त्यानंतर सूर्यानं मला जन्म दिला आणि मी उठून उभा राहिलो. मी दिवसा गाणी गात आणि रात्री स्वप्न पाहत पाहत नाईल नदीच्या काठाकाठानं चालू लागलो.

✦

आता सूर्य आपल्या सहस्र किरणांनी माझ्यावर आक्रमण करतोय, ज्यामुळे मी पुन्हा ग्रीसच्या वाळूत झोपून जाईन!

पण ही किती अनोखी गोष्ट आणि कोडं आहे. ज्या सूर्याने माझ्या जीवनतत्त्वांना एकत्र केलं, आता तोच त्यांना विलग करू शकत नाही.

तरीही मी दृढता आणि विश्वासासोबत नाईल नदीच्या काठाने चालतो आहे.

✦

आठवणीत ठेवणं हे पण एक मीलनाचंच रूप आहे.

✦

विसरून जाणं हे देखील स्वतंत्रतेचं एक रूप आहे.

✦

आम्ही काळाला असंख्य नक्षत्रांच्या चालींनी मापत असतो आणि अन्य लोक काळाला त्या छोट्या-छोट्या यंत्रांनी मापतात, ज्यांना ते आपल्या खिशात घेऊन फिरतात.

मग तुम्हीच मला सांगा की, मी आणि ते दोघेही एकाच स्थानावर एकाच वेळी कसे काय भेटू शकणार?

✦

आकाशगंगेच्या झरोक्यातून बघणाऱ्याला धरती आणि आकाशाच्या मधला प्रदेश दिसतच नाही.

✦

मानवता प्रकाशाची ती प्रवाहशील नदी आहे, जी अनादिपासून अनंतापर्यंत वाहत राहते.

✦

देवलोकात राहणारे आत्मे, दुःख आणि शोकाने पीडित मानवाचा हेवा करीत नाहीत काय?

✦